MHLA050006222019

विशेष दिवाणी दावा क्र.३१/२०१९
रावसाहेब वि. सचिव म.जी.प्रा.

## नि.क्र.५५ खालील आदेश

**०१.** वादीने सदर अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम २६ नियम १ अन्वये दिलेला असून असे कथन केले की, दि.१८/०७/२०२५ रोजी प्रतिवादीचा अंशत: उलटतपास झाला आहे. २०१९ सालापासून प्रतिवादी कर्करोगावरील उपचार घेत असून त्याची परिस्थिती गंभीर झाली आहे. त्याला नित्यकर्मे करणे अवघड झाले आहे. त्यामुळे, त्याचा पुढील उलटतपास नोंदविण्यासाठी कोर्ट कमीशनर यांची नियुक्ती व्हावी अशी विनंती करण्यात आली.

**०२.** प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी दिलेल्या नि.क्र.६० वरील म्हणण्याप्रमाणे सदर दावा दि.०३/१०/२०२३ रोजी वादीच्या अनुपस्थीतीमुळे काढून टाकला होता. वैद्यकीय कारणामुळे तो पुन्हा पटलावर घेण्यात आला. दि.१८/०७/२०२५ रोजी घेतलेल्या उलटतपासादरम्यान सदर साक्षीदार सहकार्य करीत नव्हता आणि उध्दट उत्तरे करीत होता. त्यामुळे, त्याचा उलटतपास थांबवण्यात आला. दि.२८/०८/२०२५ व १६/०९/२०२५ या दोन्ही तारखांना तो आला नाही किंवा असा अर्जही देण्यात आला नाही. साक्षीदाराचे वर्तन प्रतिवादीच्या वकिलांस धोकादायक आहे. कमीशनरपुढे साक्षीदार योग्य प्रकारे सहकार्य करेल याची हमी नसल्याने अर्ज नामंजूर करावा अशी विनंती करण्यात येते.

**०३.** उभय वकिलांचा युक्तीवाद ऐकला.

**०४.** दि.१८/०७/२०२५ रोजी उलटतपासादरम्यान सदर साक्षीदाराने न्यायालयामध्ये अयोग्य वर्तन केले होते, त्याची नोंद उलटतपासामध्ये घेण्यात आली आहे. मात्र, साक्षीदार हा स्वत: वादी असल्याने त्याला त्याची बाजू न्यायालयात येणे किंवा मांडणे आवश्यक आहे. त्याचा उलटतपास घेण्याचा प्रतिवादींचा अधिकार नाकारता येणार नाही. त्याचबरोबर, साक्षीदार यास असलेला दुर्धर आजार विचारात घेता आणि प्रतिवादींच्या वकिलांची साक्षीदाराविरुध्द असलेली तक्रार विचारात घेता न्यायालयीन आयुक्त नेमण्याऐवजी साक्षीदार

नांदेड शहरामध्ये राहत असल्याने मा. जिल्हा न्यायालय, नांदेड येथे साक्षीदार हजर राहिल्यास व्हीडीओ कॉन्फरन्सींगद्वारे त्याचा जबाब नोंदवता येईल. साक्षीदार नांदेड न्यायालयात हजर राहिल याची ग्वाही त्याच्यातर्फे वकिलांनी दिली. त्यामुळे, न्यायालयीन आयुक्त नेमण्याऐवजी सदर साक्षीदार याची व्हीडीओ कॉन्फरन्सींगद्वारे साक्ष घेण्यात येईल.

**०५.** यासाठी मा. जिल्हा न्यायालय, नांदेड यांना ईमेल करुन दि.०४/११/२०२५ रोजी दुपारी २.४५ वाजता साक्षीदार रावसाहेब गोविंदराव सानप यांची साक्ष नोंदवण्याकामी व्ही.सी.रुम उपलब्ध करुन देण्याविषयी विनंती करण्यात येते. प्रतिवादी व त्यांचे वकील यांनी वादीची साक्ष नोंदविण्यासाठी दुपारी २.४५ वाजता या न्यायालयात हजर रहावे.

स्वाक्षरीत/-

**दिनांक ०६/१०/२०२५.**

**[एस.एन.सरडे]**
**दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहदमपूर.**